# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

पदवीधर मतदार संघ अधिसभा – निवडणुक –२०१७

## सूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्या २०१६ कलम २८ मधील पोटकलम २८(२)(न) तसेच कलम १३१ त्याचप्रमाणे उच्च व तंत्र शिक्षण एकरूप परिनियम क्रमांक १ व २ दिनांक १७.०५.२०१७. त्याचप्रमाणे विद्यापीठ निदेश क्रमांक ९–ई/२०१७ व ९–एच/२०१७. त्याचप्रमाणे यापूर्वी निर्गमीत केलेली जाहिर सूचना क्रमांक गों.वि.ग./निवि/३४२१/२०१७ दिनांक १२.०७.२०१७ तसेच सूचना क्रमांक गों.वि./कुसका/५४३२/२०१७ दिनांक ०५.०९.२०१७ च्या अनुषंगाने सर्व संबंधीतांना सूचीत करण्यात येते की, दिनांक ०५.०९.२०१७ च्या सूचनेतील कार्यक्रमानुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या नोंदणीकृत पदवीधर यादीवर प्रथम पदवी तसेच इतर काही बाबी संदर्भात वैयक्तिक व सामुहिकरित्या बरेच अर्ज/निवेदने दिनांक १०.०९.२०१७ पर्यंत प्राप्त झाली.

उपरोक्त प्राप्त अर्ज/निवेदने यांचा विचार करता गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली हे नव्याने स्थापन झाले असून स्थापणेउपरांत उपरोक्त नोंदणी ही प्रथमच होत असल्यामुळे अधिकाधिक वैध पदवीधरांची नोंदणी व्हावी या सकारात्मक दृष्टीकोणातून मा. कुलगुरू महोदयांनी खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे. त्यामुळे दिनांक ०५.०९.२०१७ च्या सूचनेतील दिनांक १४.०९.२०१७ पासूनच्या कार्यक्रमात फेरबदल करण्यात आला आहे.

**विद्यापीठ निर्णय** : "आतापर्यंत (सर्व जुने व नवे) विद्यापीठात नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंद करण्यास्तव सादर केलेल्या अर्जदारांनी आपल्या अर्जात प्रथम पदवी जोडलेली नसल्यास (वर्ग बारावी नंतर प्राप्त केलेली प्रथम पदवी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर अथवा गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली) त्यांना प्रथम पदवीची प्रत त्यांच्या पदवीधर नोंदणी अर्जाला जोडण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे."

**महत्वाची सुचना** :–

अ) वर नमुद परवानगी ही फक्त दिनांक २२.०९.२०१७ पर्यतच राहील. यामध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही, याबाबत नोंद घ्यावी.

ब) प्रथम पदवी या कारणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव (नवे अथवा जुने अर्जदार) ज्यांचे अर्ज अवैध ठरविण्यात आले आहेत ते अर्ज यथास्थिती अवैधच राहतील.

क) प्रथम पदवी जोडण्यासंदर्भात अर्जदाराने व्यक्तिगतरित्या साध्या कागदावर मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे नावे अर्ज दिनांक २२.०९.२०१७ पर्यंत सादर करावा.

ड) उपरोक्त अर्जासोबत जोडलेल्या प्रथम पदवीची छायाप्रत ही स्वयंसाक्षांकित असावी व त्यावर दिनांक ०५.०९.२०१७ ला प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीतील अनुक्रमणिका क्रमांक अथवा आय.डी. क्रमांक स्पष्ट व बिनचुक लिहावा. ज्या अर्जासोबत वरील प्रमाणे अनुक्रमणिका क्रमांक अथवा आय.डी. क्रमांक नमुद केलेले नसेल तर त्या अर्जावर कार्यालयाद्वारे कोणतीही कारवाई घेतली जाणार नाही. त्यामुळे त्यांच्या अर्जाची स्थिती ही दिनांक ०५.०९.२०१७ च्या यादीनुसार कायम राहील. कृपया नोंद घ्यावी.

Likhar : D:\Election Cell\Schedule-Election

ई) कार्यालयाद्वारे कार्यालयीन वेळेत फक्त वैयक्तिकरित्या केलेले अर्ज स्विकारण्यात येतील. सामुहिकरित्या केलेले कोणतेही अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. तसेच वैयक्तिक अर्ज गठ्ठा स्वरूपात एका व्यक्तीद्वारे स्विकारण्यातयेईल परंतु ती सर्व वैयक्तिक अर्ज ही एकाच आडनावाची असावीत.

फ) कार्यालयात सादर केलेल्या सर्व अर्जाची कार्यालयाद्वारे अर्जदाराने पोच घ्यावी व ती सांभाळून ठेवावी (काही कारणास्तव अर्ज करतांना ती पोच सोबत जोडण्याकरीता).

ग) उपरोक्त निर्णय हा विद्यापीठाने सकारात्मक दृष्टीकोणातून घेतला आहे. त्यामुळे सर्व संबंधीतांना विनंती आहे की, या निर्णयानुसार विद्यापीठाला सहकार्य करावे व यामध्ये कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही. याबाबत नोंद घ्यावी.

दिनांक ०५.०९.२०१७ च्या सूचनेतील कार्यक्रम सूची अंतर्गत विविध कार्यक्रमातील दिनांक १४.०९.२०१७ नंतरचे वेळापत्रक खालील प्रमाणे.

## वेळापत्रक

| अ. क्र. | विवरण | दिनांक |
|---|---|---|
| ०१. | कुलसचिवाद्वारे दुरूस्तीनंतर पदवीधर नोंदणीची दुरूस्त (प्रथम) यादी प्रसिध्द करणे. | २६/०९/२०१७<br>सायं. ५.०० वाजेपर्यंत |
| ०२. | कुलसचिवाद्वारे दिलेल्या पदवीधर नोंदणी अर्जावरील निर्णयावर मा. कुलगुरू महोदय, यांचेकडे अपील सादर करणे. | २८/०९/२०१७<br>सायं. ५.०० वाजेपर्यंत |
| ०३. | मा. कुलगुरू महोदयाद्वारे आलेल्या अपीलावर निर्णय देणे. | २९/०९/२०१७<br>सायं. ५.०० वाजेपर्यंत |
| ०४. | कुलसचिव गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली यांच्या द्वारे पदवीधर नोंदणीची प्रथम यादी प्रसिध्द करणे.<br>(मा. कुलगुरू महोदय यांच्याकडे सादर केलेल्या अपीलाच्या निर्णया उपरांत) | ०२/१०/२०१७ |

जा.क्र./गोंवीग/नि.वि./५६०६/२०१७
दिनांक : १४/०९/२०१७
स्थळ :— गडचिरोली.

(दिपक जुनघरे)
कुलसचिव तथा
निवडणूक निर्वाचन अधिकारी
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

Likhar : D:\Election Cell\Schedule-Election